पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक १३/०६/२०१९

## अतिदुर्गम कटेझरीच्या नागरिकांची पाण्यासाठीची वणवण थांबली

- **मा. पोलीस अधीक्षकांकडून अवघ्या १५ दिवसांत वचनपुर्ती**
- **दारात आलेले पाणी पाहुन महिलांच्या डोळयात तरळले आनंदाश्रु**

अतिदुर्गम व अतिसंवेदनशिल अशा पोलीस मदत केंद्र कटेझरी अंतर्गत मौजा कटेझरी या गावाला मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी दिनांक २९/०५/२०१९ रोजी भेट दिली होती. यावेळी त्यांनी कटेझरी येथील नागरिकांशी संवाद साधुन त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या होत्या. गावातील नागरिकांनी पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना व लहान मुला-मुलींना करावी लागणारी वणवण व पायपीटीची व्यथा मा. पोलीस अधीक्षकांसेमोर मांडली होती. मा. पोलीस अधीक्षकांनी नागरिकांच्या भावना समजुन घेत शक्य तितक्या लवकर गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात येईल असे आश्वासन कटेझरी गावातील नागरीकांना दिले होते.

दरम्यान आज रोजी मा. पोलीस अधीक्षक सो. यांनी दिलेल्या आश्वासनाची पुर्तता अवघ्या १५ दिवसांत करण्यात आली. मौजा कटैझरी गावात गडचिरोली पोलीस दलातर्फे बोअरवेल खोदुन देण्यात आले. गावकऱ्यांची पाण्यासाठी होणारी पायपीट थांबावी यासाठी बोअरवेलचे बाजुला पाण्याची टाकी बसविण्यात आली. त्याचबरोबर नळजोडणी करून टाकीतुन नळाव्दारे पाणी ग्रामस्थांच्या दारापर्यंत पोहचविण्यात आले.

आज सदर योजनेचा शुभारंभ कटेझरी गावातील प्रतिष्ठीत नागरिक भिमाजी कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आला. सदर कार्यक्रमास पोलीस मदत केंद्र कटेझरी चे प्रभारी अधिकारी अक्षयकुमार गोरड, पोउपनि सागर वरूटे, पोउपनि जगन्नाथ मेनकुदळे, पोमकें कटेझरी येथील कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी नागरीकांनी मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. गडचिरोली यांचे आभार मानले. विशेषत: स्त्रियांची व लहान मुलांची पाण्यासाठी होणारी पायपीट थांबल्याने त्यांचे डोळयात आनंदाश्रु तरळले.





